| MHAU060014892021 | दाखल ता. | : | ०४/१०/२०२१ |
|---|---|---|---|
| | नोंदणी ता. | : | ०४/१०/२०२१ |
| | निकाल ता. | : | ०४/०५/२०२६ |
| | कालावधी : ०४ व. ०७ म. ०० दि. | | |

## (क्रिमीनल मॅन्युअल चाप्टर VI मधील पॅरा ४४(i))

| | | |
|---|---|---|
| | कन्नड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी श्री. वि. द. पाटील)<br>न्यायनिर्णय तारीख :०४/०५/२०२६<br>नियमित फौजदारी खटला क्र.२२८/२०२१<br>निशाणी : ४४ | |
| | (कन्नड शहर पोलीस ठाणे गु.र.नं.२४४/२०२१) | |
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन शासन तर्फे,<br>पोलीस निरीक्षक, कन्नड शहर पोलीस ठाणे यांचेमार्फत |
| अभियोग पक्षातर्फे वकील | | सहा. सरकारी वकील श्री. एन.एस.बडगुजर |
| आरोपी | | १.मयूर जयवंतराव पवार<br>वय : ३३ वर्षे, व्यवसाय : शेती<br>२.राहुल जयवंतराव पवार<br>वय : २९ वर्षे, व्यवसाय : शेती<br>३.कांता जयवंतराव पवार |

| | | |
|---|---|---|
| | | वय : ५५ वर्षे, व्यवसाय : शेती<br>४.आरती कल्याण गायके<br>वय : २६ वर्षे, व्यवसाय : शेती<br>५.भारती अमोल थोरात<br>वय : २६ वर्षे, व्यवसाय : शेती<br>६.अभय भाऊसाहेब सारंगधर<br>वय : ४४ वर्षे, व्यवसाय : शेती<br>आरोपी क्र.१ ते ३ रा.चापानेर,<br>ता.कन्नड जि.औरंगाबाद<br>आरोपी क्र.४ रा.बजाजनगर,<br>ता.गंगापुर जि.औरंगाबाद<br>आरोपी क्र.५ रा.आंबेगाव,<br>ता.गंगापुर जि.औरंगाबाद<br>आरोपी क्र.६ रा.दत्तनगर कॉलनी, नरसिंगपुर,<br>ता.कन्नड जि.औरंगाबाद |
| आरोपीतर्फे वकील | | श्री. आर.बी.सातदिवे |

## पॅरा 'ब' (क्रिमीनल मॅन्युअल मधील चाप्टर VI पॅरा ४४(ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | दि.०२/०४/२०२६ रोजीच्या ४ महिन्यानंतर ते दि.२५/०३/२०२१ पर्यंत |
| एफ.आय.आर. तारीख | ११/०८/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०४/१०/२०२१ |

| | |
|---|---|
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २२/०७/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२/०३/२०२६ |
| निकाल राखून ठेवलेली तारीख | -- |
| निकालाची तारीख | ०४/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडलेली तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मयूर जयवंतराव पवार | ३५-३ भा.ना.सु. संहितेनुसार नोटीस | -- | भा.दं.वि. ४९८ अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ | निर्दोष | -- | -- |
| २. | राहुल जयवंतराव पवार | -//- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ३. | कांता जयवंतराव पवार | -//- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | आरती कल्याण गायके | -//- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ५. | भारती अमोल थोरात | -//- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ६. | अभय भाऊसाहेब सारंगधर | -//- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |

## न्यायनिर्णय
## (घोषित तारीख : ०४/०५/२०२६)

### अभियोग पक्षाची बाजू

१. फिर्यादी ही चापानेर येथील रहिवाशी असून ती घरकाम करते. दि.०२.०४.२०१६ रोजी फिर्यादीचे लग्न आरोपी क्र.१ सोबत हिंदू रितीरिवाजाप्रमाणे चापानेर येथे झाले. त्यांच्या लग्नात संसार उपयोगी वस्तु देण्यात आल्या. त्यानंतर आरोपी यांनी तिला घरातील काम येत नाही, स्वंयपाक येत नाही असे म्हणून टोचून बोलून शिवीगाळ करुन मारहाण करीत होते. तसेच तिला वेळोवेळी घरगुती कारणावरुन तिचा मानसिक व शारिरीक छळ करत होते. त्या घटनेस अनुसरुन गु.र.क्र.२४४/२०२१ दाखल करण्यात आला.

२. तपासिक अधिकारी यांनी सर्व संबंधितांचे जाबजबाब नोंदवून आरोपी यांच्याविरुध्द पुरावा आल्यामुळे अंतिम अहवालाच्या स्वरुपात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

३. आरोपी यांना निशाणी २१ येथे वाचून दाखविला असता आरोपींनी गुन्हा नाकबुल असल्याचे सांगितले. त्यामुळे खटल्याची संपरीक्षा घेण्यात आली. त्याप्रमाणे खालील साक्षीदार तपासण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १. | मयुरी मयुर पवार (नि.२८) | फिर्यादी |

४. अभियोग पक्षामार्फत सादर केलेला पुरावा पाहता आरोपी यांनी गुन्हा केलेला आहे अशा प्रकारचे तथ्य पुराव्यात दिसून येत नसल्यामुळे त्यांचा फौ.प्र.सं.चे कलम ३१३ (१) (ब) नुसार जबाब नोंदविण्यात आला नाही.

५. उपरोक्त परिस्थितीमध्ये आरोपीं विरुध्द गुन्हा, त्यास अनुसरून सादर करण्यात आलेला पुरावा आणि त्याबाबत करण्यात आलेला युक्तिवाद पाहता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित राहतात

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपी यांनी फिर्यादी हिला घरातील काम येत नसल्यामुळे तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन तसेच तिला शिवीगाळ व मारहाण करुन उपाशी ठेवले, असे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी... |
| २. | आरोपींनी फिर्यादीला चापटबुक्याने मारहाण करुन इजा पोहचविली असे अभियोगपक्षाने | नकारार्थी... |

| | | |
|---|---|---|
| | सिध्द केले काय? | |
| ३. | आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करुन तिचा उद्देशपूर्वक अपमान केला व त्यायोगे त्याला प्रक्षोभित केले जेणेकरुन फिर्यादीकडून सार्वजनिक शांतता भंग व्हावी किंवा इतर कोणताही अपराध घडावा असा त्यामागे उद्देश होता, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी... |
| ४. | कोणता गुन्हा सिध्द झाला आहे काय ? | नाही. |
| ५. | काय आदेश ? | आरोपीला निर्दोष ठरविण्यात येते. |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्र.१ ते ३ बाबत

६. मी सरकारी वकिलांचा व आरोपींच्या वकिलांचा सखोल युक्तिवाद ऐकलेला आहे.

७. या कामात अभियोग पक्षामार्फत मयुरी मयुर पवार (फिर्यादी/सा.क्र.१/नि.२८) हिने असे कथन केले की, तिचे लग्न दि.०२.०४.२०१६ रोजी आरोपी क्र.१ सोबत झाले होते. लग्नानंतर ती चापानेर येथे नांदायला गेली होती. तिथे आरोपी व तिच्यामध्ये किरकोळ वाद झाला होता असे तिने सांगितले. तसेच तिने पुढे असे सांगितले की, असे काही घडले नाही की, दि.लग्नानंतर ३ ते ४ महिने चांगले नांदवले, त्यानंतर तिचे पती व सासरच्या लोकांनी संगनमत करुन तिला घरातील

काम येत नाही, स्वयंपाक येत नाही असे म्हणून टोचून बोलून तिला शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यानंतर तिला फिर्याद दाखविण्यात आली त्यावेळेस तिने त्यावरील केवळ सही ओळखली. परंतू, त्यातील मजकूराबाबत तिने काहीही माहिती नसल्याचे सांगितले. अभियोग पक्षास सदर साक्षीदाराने मदत न केल्यामुळे सरकारी वकिल यांच्यामार्फत तिचा उलटतपास घेण्यात आला. मात्र, तिच्या उलटतपासामध्ये तिने केवळ इतकेच सांगितले की, आरोपी व तिच्यामध्ये तडजोड झालेली असून ती आरोपी क्र.१ सोबत सासरी नांदत आहे. या व्यतिरिक्त आरोपींनी फिर्यादी हिची छळवणूक केली होती याअनुषंगाने सर्व तथ्य तिने नाकारले.

८. अशा परिस्थितीत आरोपी यांनी गुन्हा केला आहे असे निर्विवादपणे प्रस्थापित होत नाही. त्यामुळे, एकंदरीत पुरावा पाहता वादातील तथ्य प्रस्थापित होत नाही. आरोपी व वर्दीदार यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असल्यामुळे उभय पक्षकारांना या प्रकरणात स्वारस्य राहिलेले नाही असे दिसून येते. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी देतो.

**मुद्दा क्र.४ व ५ बाबत**

९. आरोपी यांनी कोणताही गुन्हा केलेला आहे असे शाबीत न झाल्याने मुद्दा क्र.४ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.५ करीता खालील आदेश पारीत करतोः–

**आदेश**

१. आरोपी यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहिता १८६० कलम ४९८–अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ नुसार ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे व जामीनदारांचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ ची पुर्तता केलेली आहे.

४. सदर न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ नुसार पाठविण्यात यावी.

(फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३५३ (१) (क) अन्वये घोषित करणेत आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.05.04 13:14:37 +0530

कन्नड (वि. द. पाटील)

दिनांक : ०४/०५/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

कन्नड

*****

## पॅरा 'क' (क्रिमीनल मॅन्युअल चाप्टर VI पॅरा ४४(ii))

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. फिर्याद पक्ष

| अ.क्र. | नाव | साक्षीदाराचा तपशील (प्रत्यक्षदर्शी, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १. | मयुरी मयुर पवार (नि.२८) | फिर्यादी |

## निशाणी पडलेले कागद

अ. फिर्याद पक्ष

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २९ | सही |

# CERTIFICATE

I affirm that the, contents of this P. D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Vishnu D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 04/05/2026 |
| Order signed by the Presiding Officer | 04/05/2026 |
| Order uploaded on | 04/05/2026 |